महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १८

# महाराजा सयाजीराव आणि हिंदू पुरोहित कायदा

देवदत्त कदम




महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था,
११५ म. गांधीनगर, औरंगाबाद - ४३१००५ मो. : ९८८१७४५६०४
Email : sayajiraogsps@gmail.com / www.sayajiraogaekwad.com

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : १८

# महाराजा सयाजीराव आणि हिंदू पुरोहित कायदा

देवदत्त कदम

महाराजा सयाजीराव संशोधन संस्था

महाराजा सयाजीराव
आणि हिंदू पुरोहित कायदा
इतिहास
देवदत्त कदम
●
प्रकाशन क्रमांक - ३८
पहिली आवृती - २०२१
●
प्रकाशक
बाबा भांड
सचिव
महाराजा सयाजीराव गायकवाड
संशोधन-प्रशिक्षण संस्था
११५, म. गांधीनगर
औरंगाबाद - ४३१ ००५
Email : baba.bhand@gmail.com
sayajiraogsps@gmail.com
संपर्क : (०२४०) २३३२६९२
९८८१७४५६०४

महाराजा सयाजीराव ज्ञानमाला : ई-बुक
संपादक : दिनेश पाटील
●
लेखक : देवदत्त कदम
'दत्तकृपा निवास', गर्ल्स हायस्कूलसमोर,
नवे पारगाव, ता. हातकणंगले,
जि. कोल्हापूर - ४१६११३
८६९८६६८८०२
●
मुद्रक : प्रिंटवेल इंटरनॅशनल प्रा.लि.
जी-१२, एमआयडीसी,
चिकलठाणा, औरंगाबाद
●
मुखपृष्ठ : महेश मोधे
●
वितरक : साकेत प्रकाशन प्रा. लि.
औरंगाबाद
●
किंमत : ३३ रुपये

---

● मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये
संस्था नोंदणी क्र. एफ - २४५९६ (औ) दि. १-१२-२०१६
● या संशोधन-प्रकाशन प्रकल्पास दिलेली देणगी प्राप्तिकर कायद्याच्या
कलम ८०जी अंतर्गत सवलतीस पात्र
● **12AA Reg.No - ITBA/EXM/S/12AA/2018-19/
101507596(1) - 14-02-2019**
● **80 G Reg. No - ITBA/EXM/S/80G/2019-20/
1018507877(1) - 30-09-2019**

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका



महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला तुटलेला इतिहास 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**दिनेश पाटील**
संपादक
**महाराजा सयाजीराव**
**ज्ञानमाला ई बुक प्रकल्प**

**बाबा भांड**
सचिव
**महाराजा सयाजीराव गायकवाड**
**सं. आणि प्र. संस्था, औरंगाबाद**

●●●



# महाराजा सयाजीराव
# आणि
# हिंदू पुरोहित कायदा

जगातील सर्व राजसत्तांचा इतिहास तपासला असता एक बाब स्पष्ट होते की, धर्मसत्ता कायमच राजसत्तेच्या डोक्यावर बसलेली असते. धर्मसत्तेचा मानसशास्त्रीय दबाव घेऊनच राजसत्ता कार्यरत असते. धर्माचा निखळ वैज्ञानिक दृष्टीने विचार करणारे सयाजीराव महाराज मात्र याला अपवाद होते. वैयक्तिक जीवनात देव, धार्मिक कर्मकांडे याबाबत विरक्त असणाऱ्या सयाजीराव महाराजांनी एखाद्या मंदिरासाठी मदत दिल्याचा किंवा एखाद्या मंदिरात श्रद्धेने नियमित पूजा-अर्चा केल्याचा पुरावा सापडत नाही. कर्मकांडमुक्त 'मानसिक पर्यावरणा'त वैज्ञानिक पद्धतीने धार्मिक श्रद्धांचा विचार करणाऱ्या सयाजीरावांनी ३० डिसेंबर १९१५ रोजी हिंदू पुरोहित कायदा हा क्रांतिकारक कायदा लागू केला. अशा प्रकारचा हा जगातील पहिला आणि आज अखेरचा एकमेव कायदा आहे.

आधुनिक भारतातील प्रबोधन परंपरेच्या केंद्रस्थानी हिंदू धर्म चिकित्सा हा विषय होता. राजा राममोहन रॉय यांच्यापासून ते बाबासाहेब आंबेडकरांपर्यंत १०० वर्षांहून अधिक काळ हिंदू धर्माची टीकात्मक समीक्षा करणारी एक सशक्त परंपरा दिसते. यामध्ये हिंदू धर्मात सुधारणा करण्यापासून ते हिंदू धर्म नाकारण्यापर्यंत विविध वळणे येऊन गेली. यामध्ये हिंदू धर्मातील प्रथा, रूढी आणि कर्मकांडे यांच्यातील फोलपणा मांडणारे धर्मचिकित्सक जसे होते तसे हिंदू धर्मग्रंथातील ब्राह्मणी राजकारण उघड करत ब्राह्मणांवर टोकाची टीका करणारेही धर्मचिकित्सक होते.

या दोन्ही परंपरांच्या मध्ये धर्मसाक्षरतेचा ‘सयाजीमार्ग’ संवादी समाजजीवनाचा राजमार्ग म्हणून अतिशय सक्षमपणे विकसित होत होता. दुर्दैवाने भारतातील धर्मचिकित्सेच्या सर्वच परंपरांनी धर्मसाक्षरतेच्या या राजमार्गाकडे चुकूनही पाहिले नाही. परंतु भारतीय धर्मचिकित्सेचा इतिहास तपासला असता भारतातील सकारात्मक धार्मिक परिवर्तनाचा सयाजीमार्ग हा सर्वात क्रांतिकारक प्रयत्न होता हे सिद्ध करणारे अनेक नवे पुरावे पुढे येत आहेत. त्यामध्ये सर्वात ठोस पुरावा म्हणून बडोद्याच्या हिंदू पुरोहित कायद्याची दखल घ्यावी लागेल.

## हिंदू पुरोहित कायद्याची 'पूर्वतयारी'

सयाजीरावांनी बडोद्यात लागू केलेला हा क्रांतिकारक कायदा समजून घेण्याअगोदर महाराजांनी राबविलेले अफाट धर्मसुधारणा कार्य समजून घ्यावे लागते. कारण धर्मसुधारणांच्या क्षेत्रात महाराजांनी जे मुलभूत काम हा कायदा करण्याअगोदर ३० वर्षे करून ठेवले होते त्यातून या कायद्याला भक्कम पाया लाभला. त्यामुळेच तो यशस्वी झाला.

१८७७ मध्ये वयाच्या १४ व्या वर्षी सयाजीरावांनी अहमदाबाद येथे सहभोजन करून अस्पृश्यता निवारणास सुरुवात केली. १८८३ मध्ये स्वत:च्या राजवाड्यातील खंडोबाचे खाजगी मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले. हे पाऊल उचलणारे सयाजीराव आधुनिक भारतातील पहिले प्रशासक ठरतात. राजवाड्यात होणाऱ्या धार्मिक विधींचे अर्थ सर्वांना समजण्यासाठी या विधींचे मंत्र अर्थासह प्रकाशित करण्याच्या उद्देशाने सयाजीरावांनी २३ नोव्हेंबर १८८६ रोजी हु.हु.नं. ५० अन्वये राजवाड्यात होणारी सर्व धार्मिक कृत्ये शास्त्रार्थासह तपशीलवार लिहून काढण्याचा आदेश दिला. रा.रा. शंकर मोरो रानडे, कृष्णदेव महादेव समर्थ आणि भाऊ मास्तर यांच्यावर ते पुस्तक तयार करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. सयाजीरावांच्या आज्ञेवरून या तिघांनी धर्मविधींचा तपशीलवार शास्त्रार्थ विशद करणारा 'ऐनेराजमेहेल' नावाचा ग्रंथ तयार केला.

या ग्रंथाविषयीची सयाजीरावांच्या मनातील आपुलकी आणि आदर विशद करताना रियासतकार सरदेसाई लिहितात, “हे पुस्तक म्हणजे महाराजांच्या नवीन प्रवृत्तीचा केवळ पाया होय. ऐनेराजमेहेलच्या अनेक आवृत्ती आजपर्यंत झाल्या आहेत आणि त्यांतील प्रकरणे पुन:पुन: चर्चा व विचार करून संपूर्ण करण्याकडे महाराजांनी इतके परिश्रम केले आहेत की बहुधा दुसऱ्या कोणत्याही विषयावर ते केले नसतील.” धर्मविषयक ज्ञानाच्या सर्वसामान्य जनतेतील प्रसारासाठीची सयाजीरावांची अगदी सुरुवातीच्या काळापासूनची धडपड यातून अधोरेखित होते. १८८७ मधील पहिल्या युरोप दौऱ्यानंतर सयाजीरावांनी कोणालाही न दुखावता प्रायश्चित्त घेतले. पुढे लगेचच सयाजीरावांनी प्रायश्चित्त घेण्यास कायद्याने बंदी घातली. १८९२ मध्ये राजवाड्याच्या देवघरातील धार्मिक विधींच्या खर्चाचे १००० पानांचे तपशीलवार बजेट छापून घेतले.

हिंदू धर्मपरंपरेतील ब्राह्मणास अन्नदान केल्याने महत्पुण्य लाभते या समजुतीमुळे १७८२ पासून बडोद्याच्या राजवाड्यात दररोज ब्राह्मण भोजनाची प्रथा सुरू झाली. पुढे या भोजनपंक्तीस उपस्थित राहणाऱ्या लोकांची संख्या अमर्याद प्रमाणात वाढल्यामुळे भोजनपंक्तीऐवजी महाराष्ट्रीयन ब्राह्मण लोकांना २ भाग तांदूळ व १ भाग डाळ या प्रमाणात कोरड्या खिचडीचा शिधा देण्यास १८०८ पासून सुरुवात करण्यात आली. सयाजीरावांचे दत्तक वडील खंडेराव महाराजांची इस्लाम धर्मावर विशेष श्रद्धा

असल्यामुळे १८५८ मध्ये मुसलमान लोकांना भोजन देण्यासाठी ग्यारमीचा कारखाना सुरू करण्यात आला. यात दररोज येतील तितक्या मुस्लिम लोकांना भोजन देण्यात येई.

ग्यारमी (मुसलमानी महिन्याचा ११ वा दिवस) व एकविसमी (मुसलमानी महिन्याचा २१ वा दिवस) दिवशी मुसलमानांना पुलाव व रोकड चिराखी (दक्षिणा) देण्यात येत असे. भोजन देत असताना व्यक्तीची गरज व उदरनिर्वाहाची अपरिहार्यता लक्षात घेतली जात नसल्यामुळे या भोजनाचा लाभ गरजूंबरोबर दरबारातील मानकरी लोकदेखील घेत. त्यामुळे महत्पुण्यासाठी केले जाणारे हे दान सत्पात्री होत नव्हते. १८७७-७८ मध्ये खिचडी व ग्यारमीवर ३,७१,६५२ रु. खर्च करण्यात आले होते. राज्याच्या उत्पन्नातील मोठा भाग या प्रथेवर विनाकारण खर्च होत होता.

बडोदा संस्थानकडून ब्राह्मण आणि मुस्लिमांना देण्यात येणाऱ्या खिचडी आणि ग्यारमीच्या या प्रथेत सयाजीरावांनी १८९३ मध्ये बदल केला. त्यानुसार सर्व जात-धर्मीय गरजूंना पासद्वारे खिचडी-ग्यारमीचा लाभ मिळावा असा हुकूम सयाजीरावांनी १६ जून १८९३ रोजी काढला. त्यामुळे ब्राह्मण आणि मुसलमान व्यक्तींबरोबरच इतर जातीतील गरजूंना देखील याचा लाभ मिळू लागला. १९०५-०६ मध्ये १०४१ हिंदू व ८०८ मुसलमान व्यक्तींना हे पास देण्यात आले. एप्रिल १९१७ मध्ये महाराजांनी बडोद्यात स्वतंत्र धर्म खात्याची सुरुवात केली. स्वतंत्र धर्म खाते स्थापन करणारे सयाजीराव हे आधुनिक इतिहासातील पहिले प्रशासक ठरतात.

## भारतातील पहिला मराठा पुरोहित वर्ग

१८९६ मध्ये बडोद्यात मराठा जातीचे पुजारी तयार करण्याचा वर्ग सुरू झाला. यानंतर २१ वर्षांनी याचे अनुकरण १९१७ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापुरात वेदोक्त पाठशाळा सुरू करून केले. १८९१ ते १८९६ अशी ६ वर्षे आपला 'गृहपाठ' पक्का करून मे १८९६ मध्ये मसुरी स्वारीतून सयाजीरावांनी वेदोक्तासंदर्भातील हुकूम काढला. त्यानुसार १५ ऑक्टोबर १८९६ पासून म्हणजेच दसऱ्याच्या दिवसापासून राजवाड्यातील सर्व धार्मिक कार्ये वेदोक्त पद्धतीने सुरू करण्यात आली. १८९८ मध्ये वेदोक्त विधीनुसार राजकुमारांच्या मुंजी घडवून महाराजांनी पुढचा टप्पा गाठला. राजकुमारांच्या मुंजी वेदोक्त पद्धतीने केल्यानंतर त्या विधींचे हेतू व अर्थ समजून घेण्यासाठी सयाजीराव महाराज स्वतः रियासतकार सरदेसाईंकडे दोन ते तीन वर्षे संस्कृत शिकत होते.

वेदोक्ताचा हुकूम काढण्याअगोदर ३ महिने वीडन यांना लिहिलेल्या पत्रात या संदर्भातील स्वतःची भूमिका स्पष्ट करताना महाराज म्हणतात, "अलीकडे काही दिवस मी वेदोक्त आणि पुराणोक्त या दोन धर्मविधींसंबंधी माहिती गोळा करीत आहे. त्यापैकी सामाजिकदृष्ट्या वेदोक्त पद्धती ही श्रेष्ठ मानली जाते. व्यक्तिशः या दोन्ही पद्धतींत मला स्वतःला कमीअधिकपणा काहीच वाटत नाही. परंतु लोक मात्र पहिलीला अधिक महत्त्व देतात, म्हणून मी ही सुधारणा हाती घेतली आहे. लोक जर

विधींना महत्त्व देतात, तर ते विधी योग्य आणि धर्मतत्त्वांना धरून तरी असावेत, हे स्पष्ट आहे.”  सयाजीरावांनी धर्म हा कधीच वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न केला नाही, तर सामाजिक जीवनाचे एक अंग म्हणून धर्माबाबत लोकांनी जास्तीत जास्त वैज्ञानिक पद्धतीने विचार करावा यासाठी प्रयत्न केले.

१ ऑगस्ट १९१६ रोजी सयाजीरावांनी बडोदा कॉलेजमध्ये तत्त्वज्ञान आणि तुलनात्मक धर्म अभ्यासाचे जगातले बहुधा पहिले अध्यासन सुरू केले. या अध्यासनाच्या वतीने १९१८ मध्ये सुरू करण्यात आलेल्या ‘द गायकवाड स्टडीज इन रिलीजिन अँड फिलॉसॉफी’ या मालेत हिंदू, बौद्ध, इस्लाम, ख्रिश्चन, ज्यू या प्रमुख धर्मांवरील ग्रंथांबरोबर तुलनात्मक धर्म अभ्यास आणि नीतिशास्त्र या विषयांवरील एकूण १७ ग्रंथ प्रकाशित करण्यात आले. आजवरच्या जगाच्या इतिहासातील अशा प्रकारची ही एकमेव ग्रंथमाला आहे.

## सयाजीरावांची क्रांतिकारक मांडणी : ‘The Depressed Classes’ निबंध

१९३६ च्या Annihilation Of Caste या आपल्या जगप्रसिद्ध ग्रंथात ‘प्रबोधनाशिवाय कोणतीही क्रांती होत नाही’ हा जो क्रांतिकारक सिद्धांत बाबासाहेब मांडतात. त्या सिद्धांताची तुलना सयाजीरावांच्या धर्मसाक्षरता अभियानाशी केली असता बाबासाहेबांनी हा सिद्धांत मांडण्याअगोदर ५० वर्षे सयाजीरावांनी १८८६ मध्ये ऐनेराजमेहेल या अत्यंत क्रांतिकारक

ग्रंथाद्वारे धर्मसाक्षरतेतून प्रबोधनाचे महाअभियान सुरू केले होते हे सिद्ध होते. महत्त्वाचे म्हणजे **Annihilation of Caste** ची पूर्वतयारी ठरणारा **'The Depressed Classes'** हा इंग्रजी निबंध महाराजांनी १९०९ मध्ये लिहिला होता. या निबंधात अस्पृश्यता हा राष्ट्रीय प्रश्न आहे ही ऐतिहासिक मांडणी महाराजांनी भारतात सर्वप्रथम केली होती. या निबंधात 'अस्पृश्यतायुक्त भारत म्हणजे राष्ट्रीय आत्महत्या आहे' हा सिद्धांत महाराजांनी मांडला. महत्त्वाचे म्हणजे अस्पृश्यता ही धर्माची उत्पत्ती असल्याची स्पष्ट मांडणी या निबंधात महाराजांनी केली.

**Annihilation of Caste** मध्ये बाबासाहेबांनी जी मांडणी केली होती त्याची तुलना महाराजांच्या या निबंधाशी केली असता बाबासाहेबांअगोदर २७ वर्षे सयाजीरावांनी जी मांडणी केली होती त्या मांडणीशी सुसंगत बाबासाहेबांनी पुढचा प्रवास केला असल्याचे दिसते. **Annihilation of Caste** या प्रबंधाची मांडणी करत असताना बाबासाहेबांनी सयाजीरावांचा हा निबंध वाचला होता का याबद्दल कोणतेही संदर्भ सापडत नाहीत. म्हणूनच या दोन्ही निबंधांमधील साम्य हा सुखद योगायोग आहे.

१९०४ मध्ये केलेल्या बालविवाह प्रतिबंधक कायद्याची तयारी महाराज १८८६ पासून म्हणजेच १८ वर्षे अगोदर, १९०६ मध्ये लागू केलेल्या सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याची तयारी १८८२ पासून म्हणजेच २४ वर्षे अगोदर, १९१५ च्या पुरोहित कायद्याची तयारी १८८६ पासून म्हणजेच २९ वर्षे

अगोदरपासून करत होते. ही काही उदाहरणे पाहता क्रांतिकारक परिवर्तनाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आवश्यक प्रबोधनाला पुरेसा वेळ देणे किती गरजेचे असते हे महाराजांच्या परिपूर्ण प्रयत्नातून लक्षात येते.

राजर्षी शाहूंनी १९०१ मध्ये राजवाड्यातील सर्व विधी वेदोक्त पद्धतीने करण्याचा आदेश काढला. राजघराण्यातील सर्व विधी वेदोक्त पद्धतीने करण्यास ब्राह्मण पुरोहितांचा विरोध असल्याने राजर्षी शाहूंनी आपल्या स्वभावाप्रमाणे बेधडकपणे राजवाड्यातील विधी करण्यासाठी ब्राह्मण पुरोहितांऐवजी मराठा पुरोहितांची नेमणूक केली. ब्राह्मणांचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी राजर्षी शाहूंनी हा निर्णय घेतला. त्यानुसार मराठा पुरोहित राजवाड्यातील विधी करू लागले. राजवाड्यातील वेदोक्त विधी करणारे हे मराठा पुरोहित स्वतःच्या घरातील धार्मिक विधी करण्यासाठी मात्र ब्राह्मण पुरोहितांना बोलावत. जनतेच्या धार्मिक प्रबोधनाशिवाय नियम लागू केल्याचा हा परिणाम होता.

## जगातील 'एकमेव' हिंदू पुरोहित कायदा

हिंदू पुरोहित कायदा लागू करण्यापाठीमागील सयाजीरावांची भूमिका समजून घेण्यासाठी महाराजांनी १९०७ मध्ये भोर येथे केलेले भाषण मार्गदर्शक ठरते. भोर संस्थानात ८ सप्टेंबर १९०७ रोजी केलेल्या भाषणात सयाजीरावांनी ब्राह्मण पुरोहित वर्गाच्या धोरणाची जी चिरफाड केली आहे ती अत्यंत मर्मभेदी आहे.

या भाषणात सयाजीराव म्हणतात, “ब्राम्हण विद्वान आहेत; पण देशाची सुधारणा होणे असेल तर ब्राह्मणांच्या विद्वत्तेबरोबर त्यांचे विचारही सुधारले पाहिजेत. ब्राम्हण-भिक्षुकवर्ग यांचे कर्तव्य किती महत्त्वाचे आहे याचा विचार करा. परंतु ते आपल्यावरील जबाबदारी ओळखीत नाहीत, ही गोष्ट फार वाईट आहे. मी खरे आहे ते बोलतो याचा कोणी राग मानू नये. बैलावर साखरेची अगर मातीची गोणी घातली तरी त्याला सारखीच, त्याप्रमाणे भिक्षुकवर्गाची स्थिती झाली आहे. भिक्षुकांचे नुसते पोपटपंचीचे ज्ञान बिलकूल उपयोगाचे नाही असा श्रेष्ठ वर्ग जर अडाणी राहिला तर देशाचे कोणत्याही प्रकारे कल्याण होणार नाही. सुशिक्षित शास्त्री संस्कृत पाठ म्हणू शकतात; परंतु मातृभाषेत आपले विचार त्यास सांगता येत नाहीत. धर्माचा उपदेश देणारे लोक चांगले समजदार असले पाहिजेत. जुने रिवाज मोडणे शक्य व कायदेशीर असेल तर राजाने धैर्याने त्यात फेरफार केला पाहिजे.” या पार्श्वभूमीवर आपल्याला १९१५ चा हिंदू पुरोहित कायदा समजून घ्यावा लागेल.

पुरोहित कायदा १९१५ मध्ये लागू केला असला तरी १९११ पासून सयाजीरावांनी त्याची पार्श्वभूमी तयार करण्यास सुरुवात केली होती. १९११ मध्ये पुरोहित व पुराणिक यांचे धार्मिक ज्ञान तपासण्यासाठी परीक्षा घेण्याचा आदेश सयाजीरावांनी दिला. या आदेशानुसार नोव्हेंबर १९१२ मध्ये बडोद्यात पुरोहित व

पुराणिकांची पहिली परीक्षा घेण्यात आली. कोणतीही सुधारणा करत असताना सुधारणेशी संबंधित सर्व घटकांना त्या प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्याचे धोरण सयाजीरावांनी प्रत्येक बाबीत जाणीवपूर्वक राबवले. त्यांच्या या धोरणानुसार २२ मे १९१३ रोजी हिंदू पुरोहित बिल प्रसिद्ध करून त्यावर समाजातील विविध घटकांच्या सूचना मागवण्यात आल्या.

१९१३-१४ मध्ये धारा सभेची २ अधिवेशने आयोजित करण्यात आली होती. यापैकी १३-१५ एप्रिल १९१४ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या धारा सभेच्या सत्रात हिंदू पुरोहित कायद्याच्या मसुद्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. पहिल्या दिवशी झालेल्या चर्चेवेळी देवासचे महाराज उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी सयाजीरावांनी या चर्चेला हजेरी लावली होती. धारा सभेतील या चर्चेनंतर जनतेच्या सूचनांसाठीचा वेळ वाढवून देण्यात आला. जनतेकडून करण्यात आलेल्या सूचनांनुसार पुरोहित बिलामध्ये दोनवेळा सुधारणा करण्यात आल्या.

बिलावरील चर्चेला पुरेसा वेळ देवून आणि विविध घटकांकडून करण्यात आलेल्या सूचनांनुसार योग्य ते बदल करून ३० डिसेंबर १९१५ रोजी बडोदा जिल्ह्यात हिंदू पुरोहित कायदा लागू करण्यात आला. धार्मिक विधी करण्यासाठी योग्य धार्मिक शिक्षण घेतलेले पुरोहित तयार करणे हा या कायद्याचा उद्देश कायद्याच्या उद्देशपत्रिकेत नमूद करण्यात आला होता. पुढे १४ सप्टेंबर

१९३४ ला हा कायदा संपूर्ण संस्थानात लागू करण्यात आला. सामाजिक सुधारणा करण्याआधी समाजाची मानसिक तयारी झाली नसल्यास सामाजिक सुधारणांचे प्रयोग अपयशी ठरल्याचे अनेक दाखले आपल्याला भारतीय इतिहासात सापडतात. १९१५ मध्ये बडोदा संस्थानात लागू करण्यात आलेल्या या कायद्याला श्रावणमास दक्षिणा सुधारणांची पार्श्वभूमी लाभली होती.

हिंदू पुरोहित कायद्यानुसार बडोदा संस्थानात पौरोहित्य करू इच्छिणाऱ्या व्यक्तींना बडोद्यातील हिंदू पुरोहित परीक्षा, याज्ञिक विषयातील किंवा श्रावणमास दक्षिणा परीक्षा यापैकी एक परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आले. या परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या व्यक्तींना सरकारकडून प्रशस्तीपत्र दिले जाई. हे प्रशस्तीपत्र मिळवणाऱ्या व्यक्तीलाच बडोदा संस्थानात पौरोहित्य करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला. केवळ परंपरेने चालत आलेला व्यवसाय म्हणून कुणालाही पौरोहित्य करता येणार नाही अशी व्यवस्था या कायद्याने करण्यात आली. जगभरातील विविध धर्मांच्या इतिहासाचा विचार करता आजवर धर्मसत्ता ही नेहमीच राजसत्तेला वरचढ ठरल्याचे आपण जाणतो. अशा परिस्थितीत परंपरेने धर्मविधी करणाऱ्या पुरोहितांच्या धार्मिक ज्ञानाची तपासणी करण्यासाठी परीक्षा घेण्याचा सयाजीरावांचा निर्णय क्रांतिकारक ठरतो.

## हिंदू पुरोहित कायद्यातील तरतुदी

३० डिसेंबर १९१५ रोजी बडोदा जिल्ह्यात लागू करण्यात आलेल्या हिंदू पुरोहित कायद्यात पुढील प्रमुख तरतुदी करण्यात आल्या होत्या.

१) बडोदा सरकारकडून घेण्यात येणाऱ्या हिंदू पुरोहित परीक्षा, याज्ञिक विषयातील किंवा श्रावणमास दक्षिणा परीक्षा यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या पुरोहिताला पौरोहित्यासाठीचा परवाना देण्यात येईल.

२) या कायद्यातील तरतुदींचा भंग करणाऱ्या सरकारी परवानाप्राप्त पुरोहितावर बडोदा सरकारने नियुक्त केलेल्या न्यायालयात खटला चालवण्यात येईल.

३) एखाद्या जातीत सरकारी परवानाप्राप्त पुरोहित उपलब्ध नसल्यास त्या जातीतील पारंपरिक पुरोहितास धार्मिक विधी करता येतील.

४) बडोदा सरकारने निश्चित केलेल्या अंत्यविधी व इतर काही विशेष धर्मविधींना या कायद्यातील तरतुदींमधून वगळण्यात आले आहे.

५) बडोदा सरकारने काही विशेष कारणास्तव सूट दिलेल्या व्यक्तीला पुरोहित परीक्षेचा नियम लागू नसेल.

पुरोहित कायद्यातील तरतुदीनुसार हिंदू धर्मातील कोणत्याही जातीतील व्यक्तींना पौरोहित्यासाठीची परीक्षा देण्याचा अधिकार प्राप्त झाला. या तरतुदीमुळे धार्मिक विधी करण्याबाबतची

ब्राह्मणांची मक्तेदारी संपुष्टात आली. पौरोहित्यासाठी परीक्षा बंधनकारक करत असतानाच या परीक्षेद्वारे प्राप्त परवान्याला कालमर्यादादेखील घालण्यात आली. सुरुवातीला एकदा परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ५ वर्षे पौरोहित्य करण्याची मुभा या कायद्यांतर्गत देण्यात आली होती. नंतरच्या काळात ही मर्यादा ३ वर्षांवर आणि शेवटी १ वर्षांवर आणण्यात आली. पौरोहित्य करण्यासाठी दरवर्षी होणारी परीक्षा उत्तीर्ण होऊन परवाना मिळवणे पुरोहितांना बंधनकारक बनले. या एक वर्षाच्या कालमर्यादेमुळे पुरोहितांना दरवर्षी आपले धर्मविषयक ज्ञान अद्ययावत करणे आवश्यक झाले.

नव्याने पौरोहित्य करणाऱ्या व्यक्तींचे ज्ञान तपासतानाच परंपरेने पौरोहित्य करणाऱ्या पुरोहितांनादेखील सयाजीरावांनी ही परीक्षा ६ वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे बंधनकारक केले. पुरोहित परीक्षेसाठी नेमण्यात आलेला अभ्यासक्रम समजून घेणे येथे आवश्यक ठरेल. या परीक्षेसाठी वेदपाठ, श्रौत व स्मार्त, याज्ञिक, वेदार्थकथन, तंत्रशास्त्र, धर्मशास्त्र, पूर्वमीमांसा, वेदांत, व्याकरण, न्यायशास्त्र, साहित्य, ज्योतिष, आयुर्वेद, सप्रयोग पुराण व सप्रयोग कीर्तन असा अभ्यासक्रम नेमण्यात आला होता. पुरोहित परीक्षेसाठी नेमण्यात आलेला हा अभ्यासक्रम विचारात घेतला तर पुरोहितांना दरवर्षी कराव्या लागणाऱ्या तयारीची आपल्याला कल्पना येते.

सरकारी परीक्षा उत्तीर्ण होऊन पौरोहित्य करणाऱ्या परवानाधारक पुरोहितांना ते करत असलेल्या धार्मिक विधीचा शास्त्रार्थ यजमानाला त्याच्या मातृभाषेत समजावून सांगण्याचे बंधन पुरोहित कायद्यात घालण्यात आले. स्वत:च्या घरात केल्या जाणाऱ्या धर्मविधींचा अर्थ यजमानांना कळावा आणि त्यांची धर्मविषयक समज वाढावी हा या नियमामागील प्रमुख उद्देश होता. आजवर बहुजन समाजासाठी गूढ राहिलेल्या धर्म विधी प्रक्रिया आणि मंत्रांविषयीची भीती कमी होण्यास या नियमामुळे मदत झाली. सध्या सत्यनारायण पूजा, शांतीचे विधी, वास्तुशांती इ. धार्मिक विधींचा आज येणारा अनुभव आपण डोळ्यासमोर आणला तर पुरोहित कायद्यामागील सयाजीरावांच्या क्रांतिकारक दूरदृष्टीची आपल्याला कल्पना येते.

पुरोहितांनी करावयाच्या धार्मिक विधींबाबत केवळ नियम करून स्वस्थ न बसता या नियमांची कठोर अंमलबजावणी करण्याकडे सयाजीरावांनी विशेष लक्ष दिले. परवानाधारक पुरोहिताला कायदाभंगाच्या प्रकरणात बडोदा सरकारने नियुक्त केलेल्या न्यायासनासमोर उपस्थित राहणे अनिवार्य होते. कायद्याचा भंग करणाऱ्या पुरोहितावर न्यायालयात खटला चालवण्याचे अधिकार सरकारला होते.

विनापरवाना पौरोहित्य करणाऱ्या अथवा विधींवेळी यजमानांना मंत्रांचा अर्थ त्यांच्या मातृभाषेत समजावून न सांगणाऱ्या पुरोहितांना २५ रु. दंडाची तरतूद पुरोहित कायद्यात

करण्यात आली होती. धर्म विधी करणाऱ्या पुरोहितांना कायद्याच्या कक्षेत आणून त्यांना कर्तव्यातील हलगर्जीबाबत शिक्षा करणारा पुरोहित कायदा हा जगातील अशा प्रकारचा पहिला कायदा ठरतो. तर कायद्याच्या माध्यमातून पुरोहित वर्गाला धार्मिक शिस्त लावणारे सयाजीराव जगातील पहिले प्रशासक ठरतात.

१९१५ च्या या पुरोहित कायद्यानुसार सर्व जातीतील पुरोहितांना धार्मिक विधी करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला असला तरी ब्राह्मणेतर जातीतील व्यक्तींना पारंपरिक समाजव्यवस्थेत संस्कृत शिक्षण उपलब्ध नसल्यामुळे पुरोहित कायद्यातील तरतुदींचा लाभ घेणे शक्य नव्हते. पुरोहित कायदा लागू करत असतानाच समाजातील ब्राह्मणेतर जातींना विशेषत: अस्पृश्य जातींना संस्कृत शिक्षण देण्याची आवश्यकता होती. म्हणूनच कायदा लागू करण्यापूर्वी २ वर्षे १९१३ मध्ये अस्पृश्य पुजाऱ्यांना संस्कृत शिक्षण देण्याच्या उद्देशाने पुरोहित प्रशिक्षण शाळा सुरू केल्या. पहिल्याच वर्षी या शाळेत २५ अस्पृश्य विद्यार्थी संस्कृत शिक्षण घेत होते. या शाळेतील अस्पृश्य विद्यार्थ्यांना महाराजांनी ५ रु. च्या १० शिष्यवृत्तीही सुरू केल्या. सयाजीरावांची ही पूर्वतयारी त्यांची मूलगामी समाजसुधारणेची धडपड स्पष्ट करते.

पुढे १९२८ मध्ये हिंदू विवाह कायद्यात सुधारणा करून विवाहाविषयक सर्व वैदिक मंत्रांचे मराठी, गुजराथी व हिंदी या भाषांमध्ये भाषांतर करून ते सरकारमार्फत प्रसिद्ध करण्यात यावे, ते भाषांतर वधू-वरांच्या मातृभाषेत लग्न लावणाऱ्या पुरोहिताने वाचून समजावून सांगावे व तसे न केल्यास त्याला ५० रु. दंड करण्याची तरतूद केली. हिंदू विवाह कायद्यातील हा बदल म्हणजे पुरोहित कायद्याची व्याप्ती वाढवण्याचा एक सकारात्मक प्रयत्न होता.

## हिंदू पुरोहित कायद्यातील सवलती

पुरोहित कायदा लागू करत असताना यामध्ये पुढील काही बाबींमध्ये सवलती देण्यात आल्या.

१) पुरोहित कायदा लागू झाल्याच्या तारखेच्या १२ वर्षे अगोदर धर्मशिक्षण घेतलेल्या पुरोहितांना सुरुवातीच्या काळात या कायद्यातून वगळण्यात आले.

२) एक महिन्यापेक्षा कमी कालावधीसाठी बडोद्यात वास्तव्यास आलेल्या बडोद्याबाहेरील पुरोहितांना हा कायदा लागू करण्यात आला नाही.

३) एखाद्या समाजात वा ठरावीक भौगोलिक क्षेत्रात सरकारी परीक्षा उत्तीर्ण झालेला एकही परवानाधारक पुरोहित उपलब्ध होत नसल्यास त्या समाजातील परंपरेने पौरोहित्य करणाऱ्या व्यक्तीला धार्मिक विधी करण्याची परवानगी देण्यात आली.

४) एखाद्या वेळी सामूहिकरीत्या धार्मिक विधी करत असताना पुरेशा प्रमाणात परवानाधारक पुरोहित न मिळाल्यास धर्मविधींना अडथळा निर्माण होण्याची शक्यता होती. त्यामुळे अशा सामूहिक धार्मिक कार्यक्रमांसाठी परवानाधारक पुरोहितांची अट शिथिल करण्यात आली होती. कायदा लागू करत असताना समाजमत या सुधारणांच्या विरोधात जाणार नाही याची घेतलेली काळजी पुरोहित कायद्यात देण्यात आलेल्या या सवलतीवरून आपल्याला दिसून येते. अपवादात्मक परिस्थितीत परवाना नसलेल्या पुरोहितांकडून करण्यात आलेल्या विधींच्या कायदेशीरपणाबाबत शंका उपस्थित होण्याची शक्यता होती. विनापरवाना पुरोहितांकडून करण्यात आलेल्या धार्मिक विधींची वैधता या कायद्यातील विशेष तरतुदीच्या आधारे कायम ठेवण्यात आली.

५) बडोदा सरकारकडून निश्चित केलेल्या अंत्यविधी व इतर काही विशेष धर्मविधींना हा परवानाधारक पुरोहितांचा नियम लागू करण्यात आला नाही. तसेच बडोदा सरकारने काही विशेष कारणास्तव सूट दिलेल्या व्यक्तीला पुरोहित कायद्यात निर्धारित केलेल्या परीक्षेच्या नियमातून वगळण्यात आले होते. समाज परिवर्तन घडवू इच्छिणारा बदल अमलात आणताना कायद्याच्या धाकापेक्षा समाजाच्या मानसिकतेतील बदलाच्या जोरावर तो बदल घडवण्याकडे असणारा सयाजीरावांचा कल पुरोहित कायद्यात दिलेल्या सवलतींवरून स्पष्ट होतो.

## हिंदू पुरोहित कायदा : आंबेडकरांकडून 'जसेच्या तसे' अनुकरण

जगभर धर्म आणि पुरोहित वर्गाचे वर्चस्व असताना पुरोहितांकडून होणाऱ्या शोषणातून लोकांची मुक्तता करणारा पुरोहित कायदा हा जगातील अशा प्रकारचा एकमेव कायदा होता जो आजच्या क्रांतिकारक बदलाच्या कालखंडातही भारताला करणे सहज साध्य नाही. सयाजीरावांनी बडोद्यात लागू केलेला पुरोहित कायदा ही २००० वर्षांच्या हिंदू धर्म-संस्कृतीच्या इतिहासातील एक मोठी क्रांती होती. परंतु हिंदू धर्म अभ्यासाच्या इतिहासात या कायद्यावर एक शब्दही लिहिला गेला नाही.

या कायद्याचा बौद्धिक चर्चाविश्वात उपयोग करणारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव आहेत. १९३६ मध्ये लाहोरच्या जातपात तोडक मंडळाच्या न झालेल्या वार्षिक परिषदेसाठी बाबासाहेबांनी तयार केलेले अध्यक्षीय भाषण त्याच वर्षी 'Annihilation Of Caste' या नावाने ग्रंथ रूपात प्रकाशित झाले. या ग्रंथाच्या २४ व्या भागात अस्पृश्यता निर्मूलनाच्या दृष्टीने धार्मिक सुधारणांसाठीचे मुद्दे बाबासाहेबांनी सुचवले आहेत.

या निबंधात बाबासाहेब म्हणतात, "जेव्हा मी नियमाच्या धर्माचा निषेध करतो तेव्हा धर्माची गरज नाही असे माझे मत असल्याचा समज होता कामा नये. या उलट बर्कच्या पुढील विधानाशी मी सहमत आहे, "खरा धर्म हा समाजाचा पाया असतो

ज्यावर तमाम खऱ्या नागरी शासन व्यवस्था तसेच दोहोंच्याही मान्यता अवलंबून असतात.” त्यामुळे मी जेव्हा जीवनाचे हे प्राचीन नियम रद्द करा असा आग्रह धरतो त्याचवेळी त्यांची जागा तत्त्वाचा धर्म हाच खरा धर्म असल्याचा दावा करू शकत असल्यामुळे त्याने घ्यावी यासाठी मी आतूर आहे. खरोखरच धर्माच्या आवश्यकतेबाबत माझी एवढी खात्री पटली आहे की, या धर्मसुधारणेअंतर्गत काय आवश्यक बाबी असाव्यात याची रुपरेषा आपणा समोर मांडलीच पाहिजे असे मी समजतो. माझ्या मते या सुधारणांमध्ये पुढील मुद्दे मुख्य असावे :

(१) सर्व हिंदूना स्वीकारार्ह आणि मान्य असा एकच प्रमाण धर्मग्रंथ असावा. याचा अर्थ असा की हिंदू धर्माचे वेद, शास्त्र, पुराणे यासारखे पवित्र आणि प्रमाण मानले गेलेले इतर सर्व ग्रंथ कायद्याने रद्द केले पाहिजेत आणि त्या ग्रंथातील धार्मिक किंवा सामाजिक सिद्धांतांची शिकवण देणे दंडनीय ठरविले पाहिजे.

(२) हिंदूंमधल्या पुरोहितशाहीचे निर्मूलन झाले तर चांगलेच. परंतु हे अशक्य दिसते म्हणून किमान पुरोहितपद वंशपरंपरागत नसावे. स्वत:ला हिंदू म्हणवणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला पुरोहितपदासाठी पात्र मानले पाहिजे. सरकारने ठरवून दिलेली परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय आणि त्याला तो व्यवसाय करण्याची सरकारी सनद असल्याशिवाय पौरोहित्य करता येणार नाही अशी कायद्यामध्ये तरतूद करावी.

(३) सनद नसलेल्या पुरोहिताने केलेला कोणताही समारंभ विधिसंमत मानण्यात येऊ नये, तसेच सनद नसताना पौरोहित्य करणे शिक्षापात्र गुन्हा ठरविण्यात यावा.”

या निबंधातच पुढे धर्मसुधारणेसाठीचा कार्यक्रम देताना त्यासाठी कायदा करण्याची गरज व्यक्त करताना बाबासाहेब म्हणतात, “मी वर सांगितल्याप्रमाणे पुरोहितवर्गाला अशा कुठल्यातरी कायद्याच्या नियंत्रणाखाली आणलेच पाहिजे. त्यामुळे यांना उपद्रव करण्यास तसेच लोकांची दिशाभूल करण्यास प्रतिबंध होईल. तो पेशा सगळ्यासाठी खुला केल्यामुळे त्याचे लोकशाहीकरण होईल. ब्राह्मणशाही तसेच ब्राह्मणशाहीचा मूर्तीमंत अवतार असलेली जात संपविण्यासाठी त्याची खात्रीने मदत होईल. ब्राह्मणशाही हे विष असून त्याने हिंदूंचे वाटोळे केले आहे. तुम्ही ब्राह्मणशाही संपविली तर हिंदूत्व वाचविण्यात तुम्हाला यश येईल.”

बाबासाहेबांनी सुचवलेल्या धर्म सुधारणेच्या पाच कलमी कार्यक्रमातील गाभ्याचा भाग म्हणजे दोन आणि तीन क्रमांकाची कलमे आहेत. ती दोन कलमे म्हणजे सयाजीरावांनी केलेल्या पुरोहित कायद्यातील सर्व कलमांचे एकत्रीकरण आहे. हे पुरोहित कायद्यातील कलमे आणि बाबासाहेबांनी सांगितलेल्या कलमातील दोन आणि तीन क्रमांकाच्या कलमांची समोरासमोर तुलना केल्यानंतर स्पष्ट होते. यातील उरलेली तीन कलमे अत्यंत जुजबी आहेत. विशेष बाब म्हणजे बाबासाहेबांनी हा निबंध लिहिण्याआधी २१ वर्षे बडोद्यात पुरोहित  कायदा लागू झाला

होता आणि बडोद्याच्या १९१०-११ ते १९१६-१७ या पाच वर्षातील 'Administrative Report' मध्ये त्याच्या निर्मितीच्या आणि तरतुदीच्या सर्व टप्प्यांची माहिती उपलब्ध आहे. तरीही या कायद्यातील कलमांची बाबासाहेबांनी संदर्भात न देता केलेली वरील मांडणी धक्कादायक आहे.

कारण १९०७ पासून पुढे १९१७ पर्यंत सयाजीरावांच्या शिष्यवृत्तीवर बाबासाहेबांचे भारत, अमेरिका आणि इंग्लंड येथील शिक्षण झाले होते. १९१७ मध्ये काही दिवस बडोदा संस्थानात त्यांनी नोकरीही केली होती. सयाजीरावांवरील मृत्युलेखात सयाजीरावांनी केलेल्या कायद्यांना त्यांनी इंग्लंड, अमेरिकेपेक्षा पुढारलेले कायदे म्हणून हा निबंध प्रकाशित झाल्यावर तीन वर्षांनी म्हणजेच १९३९ मध्ये गौरवले होते. या सर्व पार्श्वभूमीवर 'हे असे का झाले?' हा प्रश्न आपल्याला छळत राहतो.

स्वित्झर्लंडमधील संशोधक जोहेन्स बेल्त्झ यांनी २००५ मध्ये प्रकाशित आपल्या Mahar, Buddhist and Dalit या ग्रंथात Annihilation Of Caste मध्ये बाबासाहेबांनी धर्मसुधारणेसाठी मांडलेल्या पाच कलमी कार्यक्रमाचे मूल्यमापन केले आहे. या ग्रंथात जोहेन्स बेल्त्झ म्हणतात, "This is where we see the emergence of a programme for fundamental and revolutionary reconstruction of Indian society." जोहेन्स बेल्त्झ बाबासाहेबांच्या या कार्यक्रमाला मूलभूत आणि भारतीय समाजाची क्रांतिकारक पुनर्बांधणी करणारा ठरवतात.

जोहेन्स बेल्त्झ यांनी बाबासाहेबांच्या ज्या धर्म सुधारणेच्या कार्यक्रमाचे हे मूल्यमापन केले आहे त्या कार्यक्रमातील मूलभूत गाभ्याची कलमे ही बडोद्याच्या हिंदू पुरोहित कायद्यातील असल्यामुळे हे मूल्यमापन बडोद्याच्या हिंदू पुरोहित कायद्याचेच मूल्यमापन आहे. या मुल्यमापनातून पुरोहित कायदा हा किती क्रांतिकारक होता याची प्रचीती येते. भारतीय प्रबोधन परंपरेने वेळीच सयाजीरावांच्या या कामाशी जोडून घेतले असते तर क्रांतिकारक समाजपरिवर्तनाचे सर्वच प्रबोधनपुरुषांनी पाहिलेले स्वप्न बऱ्याच अंशी पूर्ण झाले असते.

परांजपे नावाच्या ब्राह्मण मित्राच्या वरातीतून हाकलल्यानंतर वयाच्या विशीनंतर फुलेंमधील क्रांतिकारक घडला. वेदोक्ताने श्रद्धाळू राजर्षी शाहूंमधील क्रांतिकारक वयाच्या २६ व्या वर्षी जन्माला घातला. तर अस्पृश्यतेचे चटके सोसलेल्या आंबेडकरांमधील समतावादी नेता वयाच्या पंचविशीत अमेरिकेतील शिक्षणाद्वारे सयाजीरावांनी घडवला. या तुलनेत धार्मिक हक्क आणि जातिभेद यांचा कोणताही नकारात्मक अनुभव न घेताही १८७७ ला वयाच्या १४ व्या वर्षी अस्पृश्यांबरोबर सहभोजन करणारे सयाजीराव भारतातील सर्वात मोठे समाजक्रांतिकारक ठरतात. सयाजीरावांनी पुरोहित कायद्याअगोदर वैयक्तिक जीवनापासून केलेल्या धर्मसुधारणा

आणि पुरोहित कायद्यानंतर १९३९ मध्ये मृत्यूपर्यंत अत्यंत सातत्यपूर्ण आणि परिणामकारकपणे राबवलेले धर्मसाक्षरता अभियान 'सयाजीराव हे आधुनिक भारतातील सर्वात मोठे समाजक्रांतिकारक होते' हा सिद्धांत प्रस्थापित करते.

●●●

## महाराजा सयाजीराव ज्ञानमाला नामसूची

१) शिवसृष्टीचे निर्माते - सागर मोहिते
२) कृतीशील सत्यशोधक - दिनेश पाटील
३) राजर्षी शाहू - दिनेश पाटील
४) एक 'क्रांतीपर्व' - आंबेडकर
- दिनेश पाटील
५) दानशूर महाराजा सयाजीराव
- डॉ. राजेंद्र मगर
६) दामोदर सावळाराम यंदे - राजश्री कदम
७) खासेराव जाधव - शिवानी घोंगडे
८) कृष्णराव अर्जुन केळूस्कर
- सुरक्षा घोंगडे
९) सावित्रीबाई फुले - शिवानी घोंगडे
१०) विठ्ठल रामजी शिंदे - पवन साठे
११) गंगारामभाऊ म्हस्के - दिनेश पाटील
१२) रियासतकार गो. स. सरदेसाई
- दिनेश पाटील
१३) योगी अरविंद घोष - डॉ. राजेंद्र मगर
१४) महाराणी चिमणाबाई सयाजीराव
गायकवाड - सुरक्षा घोंगडे
१५) कर्मवीर भाऊराव पाटील
- शिवानी घोंगडे
१६) बडोद्यातील वेदोक्त - राजश्री कदम
१७) धर्म खाते - सुरक्षा घोंगडे
१८) हिंदू पुरोहित कायदा - देवदत्त कदम
१९) तुलनात्मक धर्मचिंतक - देवदत्त कदम
२०) जातविषयक चिंतन - सुरक्षा घोंगडे
२१) इंदिराराजेंचा क्रांतिकारक विवाह
- देवदत्त कदम
२२) हिंदू कोड बिल - देवदत्त कदम
२३) दुसरी जागतिक सर्वधर्म परिषद
- डॉ. राजेंद्र मगर
२४) सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा
- राजश्री कदम
२५) स्त्रीविषयक कार्य - शिवानी घोंगडे
२६) मराठी भाषा, साहित्य व संस्कृती
- निलोफर मुजावर
२७) संस्कृत शिक्षण - निलोफर मुजावर
२८) धर्मानंद कोसंबी - निलोफर मुजावर
२९) बौद्ध धर्म - सौरभ गायकवाड
३०) मराठी पत्रकरीता - सौरभ गायकवाड
३१) नानासाहेब शिंदे - देवदत्त कदम
३२) महात्मा गांधी - दिनेश पाटील
३३) श्रीधर व्यंकटेश केतकर
- सौरभ गायकवाड
३४) प्राच्यविद्या - सौरभ गायकवाड
३५) आरोग्य आणि व्यायामविषयक
कार्य - शिवानी घोंगडे
३६) अखिल भारतीय मराठा शिक्षण
परिषद - सत्यनारायण आरडे
३७) भारताचा स्वातंत्र्यलढा
- राहुल वणवे
३८) महाराजा सयाजीराव आणि
जगप्रवास - दिनेश पाटील
३९) निर्व्यसनी, चारित्र्यवान, सार्वभौम
राजा - बाबा भांड
४०) ललितकला - धारा भांड मालुंजकर

४१) राजा रवी वर्मा - धारा भांड मालुंजकर
४२) बालगंधर्व - धारा भांड मालुंजकर
४३) दादासाहेब फाळके
- धारा भांड मालुंजकर
४४) बडोद्यातल्या वास्तू
- धारा भांड मालुंजकर
४५) संगीत शिक्षण - धारा भांड मालुंजकर
४६) बडोद्याचे कलाभवन
- सौरभ गायकवाड
४७) बँक ऑफ बडोदा - देवदत्त कदम
४८) दुष्काळ दौऱ्याच्या नोंदी
- दिनेश पाटील
४९) शेतीविकास - देवदत्त कदम
५०) उद्योग विकास - सौरभ गायकवाड
५१) सहकार विकास - राहुल वणवे
५२) जलनियोजन (जलसंवर्धन)
- डॉ. राजेंद्र मगर
५३) पूरनिवारण - डॉ. राजेंद्र मगर
५४) सत्यशोधक धामणस्कर
- सत्यनारायण आरडे
५५) बडोद्याचा लक्ष्मीविलास पॅलेस
- पवन साठे
५६) लोकपाळ राजा सयाजीराव : चरित्र
- बाबा भांड
५७) यशवंतराव चव्हाण - दिनेश पाटील
५८) धर्म विचार - बाबा भांड
५९) राजाराम शास्त्री भागवत - बाबा भांड
६०) छत्रपती शाहू - बाबा भांड
६१) महाराजा सयाजीराव 'प्रजासत्ताक' राजा - अनिल वकटे
६२) महात्मा फुले, मामा परमानंद आणि सायाजीरावांना पत्रे - मामा परमानंद
६३) बहुजनांच्या शिक्षणासाठी मदत
- बाबा भांड
६४) आरक्षण : सयाजीरावांचे आणि शाहुंचे - दिनेश पाटील
६५) दानशूर महाराजा सयाजीराव आणि जमशेटजी टाटा - डॉ. राजेंद्र मगर

आपणास वरील पैकी काही ई-बुक हवे असल्यास संपर्क करावा

बाबा भांड - ९८८१७४५६०४, दिनेश पाटील -९६२३८५८१०४,
डॉ. राजेंद्र मगर -९४२०३७८८५०, धारा भांड मालुंजकर - ९८८१७४५६०८
महेश मोधे - ८७८८२०८९९०

## महाराजा सयाजीराव प्रकाशित साहित्य :

### ❒ महाराष्ट्र शासन : २५ खंडातील ६२ ग्रंथ = २६६४२ पृष्ठे

**मराठी :**

- भाषण संग्रह : २ ग्रंथ
- गौरवगाथा : १ ग्रंथ
- सुप्रशासन : २ ग्रंथ
- शिक्षण सुधारणा : १ ग्रंथ
- सयाजीराव चरित्रे : ५ ग्रंथ
- पत्रसंग्रह : ३ ग्रंथ
- सयाजीराव लेखन : २ ग्रंथ
- जगप्रवास : ३ ग्रंथ
- आठवणी व लेख : ३ ग्रंथ
- सुधारणा : १० ग्रंथ = एकूण ३२ ग्रंथ

**English**

- Spechess & Adresses : 2 Books
- Writings of Sayajirao : 2 Books
- World Tour Reports : 3 Books
- Biographies : 5 Books
- Letters : 4 Books
- Administration : 1 Books
- Education Reforms : 3 Books
- Total English Books : 20

**हिन्दी :**

- सयाजीराव का लेखन : १
- सयाजीराव जीवनी : २
- पत्र संग्रह : ३
- स्वतंत्र्य युद्ध के समर्थक : १
- भाषण संग्रह : २
- गौरवगाथा : १ = १० ग्रंथ

**साहित्य संस्कृती मंडळ आणि अकादमी : ५ ग्रंथ**

- महाराजा सयाजीराव ट्रस्ट : ३० ग्रंथ
- साकेत प्रकाशन प्रा. लि. औरंगाबाद
  कथा, कादंबरी, चरित्र्य, इतिहास, बोधकथा, किशोर कादंबरी, फुले, आंबेडकर, लिखित - संपादित १३ ग्रंथ

---

- महाराष्ट्र शासन प्रकाशित ग्रंथ शासकीय ग्रंथ गार आणि अधिकृत विक्रेते साकेत प्रकाशन यांचेकडे उपलब्ध.
- सयाजीराव ट्रस्ट, शासन व साकेत प्रकाशनाचे महाराजा सयाजीरावांचे वरील ग्रंथ उपलब्ध :

---

साकेत प्रकाशन प्रा. लि.,११५ महात्मा गांधीनगर, औरंगाबाद ४३१००५
मो. : ९८८१७४५६०५, ९८८१७४५६०४

●●●

# महाराजा सयाजीराव ज्ञानमाला निर्मितीमागील भूमिका

महाराजा सयाजीराव गायकवाड हे फक्त आधुनिक भारतातील सगळ्यात प्रागतिक राजे होते असे नाही तर भारतासारख्या बहुसांस्कृतिक देशाचे 'बौद्धिक नेतृत्व'च ते करत होते. धर्म, जात, तत्त्वज्ञान, शिक्षण, दातृत्त्व, संशोधन, शेती, उद्योग, आरोग्य, क्रीडा, साहित्य, संस्कृती, ललित कला, प्राच्यविद्या, पुरातत्त्व, आंतरराष्ट्रीय संबंध, स्वातंत्र्यलढा इ. मानवी समाजाच्या सर्व अंगांना कवेत घेणाऱ्या क्षेत्रात त्यांनी निर्माण केलेले मानदंड आजही भारतासाठी आदर्श आहेत. त्यामुळे ते आधुनिक भारताचे निर्माते आणि म्हणूनच खरेखुरे 'महानायक' सुद्धा आहेत.

महापुरुषांचे चिंतन हे फक्त इतिहासाच्या स्वप्नरंजनासाठी किंवा इतिहासाचा पोकळ अभिमान बाळगण्यासाठी करायचे नसते. आपल्या समकालीन जगण्यातील समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी, आपला जीवनसंघर्ष सकारात्मक करण्यासाठीसुद्धा या महापुरुषांचे पुनर्वाचन आवश्यक असते. इतिहास जितका वस्तुनिष्ठपणे आपण वर्तमानाशी जोडू तितका आपल्या समाजाचा भविष्यवेध आपल्याला अचूकपणे घेता येईल.

महाराजा सयाजीरावांचा 'उदोउदो' करण्यासाठी महाराजा सयाजीराव ज्ञानमालेची निर्मिती केलेली नाही. आजच्या आपल्या धार्मिक आणि जातीय संघर्षावर, शेती-उद्योगातील संकटांवर मात करण्यासाठी तसेच समाज म्हणून आपल्यातील 'विसंवाद' कमी करून 'सुसंवाद' वाढवण्याच्या व्यापक भूमिकेतून ही महाराजा सयाजीराव ज्ञानमाला आकाराला आली. या निमित्ताने आपला 'जोडून' वाचण्याची आणि त्यातून संवादाचे पूल उभारण्याची प्रेरणा सर्वांना मिळेल एवढे मात्र नक्की.

पहिल्या टप्प्यात साठ ई-बुक झाले आहेत.

**बाबा भांड**
सचिव

**दिनेश पाटील**
संपादक
महाराजा सयाजीराव ज्ञानमाला

**महाराजा सयाजीराव गायकवाड संशोधन व प्रशिक्षण संस्था**
११५, म. गांधीनगर, स्टेशन रोड,
औरंगाबाद - ४३१ ००५
मो. - ९८८१७४५६०४
ई-मेल : sayajiraogsps@gmail.com